शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे शासन परिपत्रक क्रमांक.:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/समन्वय दिनांक. १४ सप्टेंबर, २०१८ सोबतचे पत्र अवलोकनी घेऊन आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० जयंती निमित्त आराखडा तयार करण्याबाबतचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/१२३

दि. १४/०९/२०१८

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती
निमित्त आराखडा तयार करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/ समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ सप्टेंबर,२०१८.

शासन परिपत्रक :

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विभागाने करावयाच्या कार्यवाही संदर्भात केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री, मा.श्री.प्रकाश जावडेकर यांनी दिनांक ७/९/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश, शालेय शिक्षण व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच सर्व सचिव यांच्या समवेत व्हिडोओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. सदर बैठकीत मा.मंत्री (उ. व तं.शि.) व मा.सचिव (उ.व तं.शि.) हे हजर होते.

२. सदर बैठकीत मा.केंद्रीय मंत्री यांनी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या :-

१) महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर नाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात.
२) स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.
३) दिनांक १५.९.२०१८ रोजी श्रमदानाचे कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.
४) मानव संसाधन विकास विभागाने, महाराष्ट्राशी ज्या दुस-या राज्याची जोड (Pair State) ठरवून दिली आहे, त्या राज्याशी संपर्क करुन विद्यार्थ्यांची देवाण घेवाण (Student Exchange Programme) कार्यक्रम राबविणे.
५) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीत गायनाचे/ भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.
६) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी या कालावधीत एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रामध्ये (Community Centre) स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देऊन तो उपक्रम राबवावा.
७) महात्मा गांधीचा त्यांच्या जीवन कालावधीत महाराष्ट्रातील ज्या स्थळांशी संपर्क आला उदा.वर्धा, पवनार, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी पदयात्रा आयोजित करुन जनजागृती करावी.
८) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधीच्या विचारांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात. या विषयावर राज्यस्तर व

राष्ट्रीय स्तरावरील प्रसिध्द व्यक्तींना भाषणे (Lecture Series) देण्यासाठी आमंत्रित करावे.

९) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांचे भित्तीचित्रे (Wall Paintings) तयार करुन घ्यावीत व त्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन करावे.

१०) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये महात्मा गांधीच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी उपलब्ध करुन द्यावीत. तसेच, गुजरात, राजस्थान, बिहार इ. राज्यांनी महात्मा गांधीच्या विचारावर आधारीत काही पुस्तके प्रसिध्द केली आहेत, ती सुध्दा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करुन देण्यात यावीत.

११) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

१२) बिहार शासनाने महात्मा गांधींच्या जीवनावर प्रसिध्द केलेल्या "बापू की कहाणी" या पुस्तकाचे मराठीत भाषांतर करवून घेऊन ते पुस्तक सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये उपलब्ध करून देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१३) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजित करावे.

१४) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली/ पदयात्रा वेळोवेळी आयोजीत कराव्या व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा.

४. तरी सर्व संबंधितांनी त्यांचे स्तरावर वरीलप्रमाणे कार्यवाही करुन आवश्यक तो आराखडा तात्काळ तयार करावा व सदर उपक्रम राबवून त्याचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. तसेच संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांनी या संपूर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण (monitoring and control) ठेवावे व अहवाल शासनास सादर करावा. तसेच या सर्व उपक्रमांचे छायाचित्र व व्हिडिओ यांना योग्य ती प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

द.रा.कहार

(द.रा.कहार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

सर्व कुलगुरु तथा सर्व कुल सचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
सर्व सह/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
संचालक, उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मंत्रालय, मुंबई.
संग्रहार्थ.